**शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून राज्यातील विद्यमान संस्थामधील अभ्यासक्रम बंद करण्यास व प्रवेशक्षमतेत घट करण्यास अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन मान्यता देण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः टीईएम-२०१४/प्र.क्र. १२९/तांशि-४**

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२

तारीख: ०४ ऑगस्ट, २०१४

<u>वाचा :-</u>

१) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचा ई-मेल, दिनांक ०५.०७.२०१४

२) संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक २/एनजीसी /मान्यता/ २०१४/ ६०८, दि. ०७.०७.२०१४

<u>प्रस्तावना :-</u>

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी त्यांच्या दिनांक ०७.०७.२०१४ च्या ई-मेल द्वारे तंत्र शिक्षण संचालनालयास राज्यात सुरु असलेल्या अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र /वास्तुशास्त्र /एचएमसीटी / एमबीए/ एमसीए/ पीजीडीएम या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करीता दिलेल्या मान्यतेची यादी ०५.०७.२०१४ रोजी उपलब्ध झाली आहे. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासुन राज्यातील विद्यमान व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या ५७ संस्थेतील ९६ अभ्यासक्रम बंद / प्रवेशक्षमता कमी करण्यास परिषदेने मान्यता दिलेली असुन याबाबतची तपशिलवार माहीती संचालक, तंत्र शिक्षण यांनी सोबतच्या विवरणपत्र अ मध्ये सादर केली आहे. तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने १ संस्थेतील ६ अभ्यासक्रमांची प्रवेशक्षमता थेट कमी केली असुन याबाबतची तपशिलवार माहीती संचालक, तंत्र शिक्षण यांनी सोबतच्या विवरणपत्र ब मध्ये सादर केली आहे. उपरोक्तप्रमाणे अभ्यासक्रम बंद करणे, विद्यमान संस्थेतील सुरु असलेल्या प्रवेशक्षमतेत घट करणे व विद्यमान संस्थेतील प्रवेशक्षमता परिषदेमार्फत थेट कमी करणे यासाठी परिषदेने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन मान्यता देण्यासाठी संचालक, तंत्र शिक्षण यांनी केलेल्या शिफारसीच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासुन सोबतच्या विवरणपत्र अ व ब मधील अभ्यासक्रम बंद करणे, विद्यमान संस्थेतील सुरु असलेल्या प्रवेशक्षमतेत घट करणे व विद्यमान संस्थेतील प्रवेशक्षमता परिषदेमार्फत थेट कमी करणे यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या ई_मेल च्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासुन संचालक, तंत्र शिक्षण यांच्या उपरोक्त वाचा २) वरील पत्रासोबतच्या विवरणपत्र अ व ब मधील संस्थांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अभ्यासक्रम बंद करणे, विद्यमान संस्थेतील सुरु असलेल्या प्रवेशक्षमतेत घट करणे व विद्यमान संस्थेतील प्रवेशक्षमता परिषदेमार्फत थेट कमी करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०८०४१५१३२४४००८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Madan Maruti Morve

Digitally signed by Madan Maruti Morve
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Higher & Technical Education, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Madan Maruti Morve
Date: 2014.08.08 17:56:34 +05'30'

(म. मा. मोरवे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय (सर्व संबंधित विभागीय कार्यालये).
३. संबधित संस्था (संचालकांमार्फत)
४. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१.
५. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), नवी दिल्ली.
६. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई.
७. निवड नस्ती/तांशि-४